# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६२११५६
२५६२११५७
२५६२११५८
२५६२११६३

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल - approval@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/4056

दिनांक : 05/12/2023

**स्मरणपत्र — १**

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय — रिक्त अध्यापकीय पदे नियमित स्वरूपात त्वरित भरण्याबाबत ...**

**संदर्भ — सीसीओ/२७६७, दिनांक ०१/०९/२०२३**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाने दिनांक १६ मे, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व विद्यापीठ स्तरावर आणि स्वायत्त महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरू करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विद्यापीठातील शैक्षणिक विभागातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम आणि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठाशी संलग्नित स्वायत्त आणि अस्वायत्त कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखडा तयार करण्यात आला असून, सदरचे अभ्यासक्रमही नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात येणार आहेत.

स्वायत्त दर्जाप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम हे नवीन शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरू करण्यात येणार आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदवी आणि स्वायत्त दर्जाप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम हे नवीन शैक्षणिक धोरणानुसार सुरू करण्यात येणार आहेत.

प्राप्त आदेशावरून कळविण्यात येते की, वरील पार्श्वभूमी विचारात घेता आपल्या संस्थेच्या महाविद्यालयांतील प्राचार्य/ संचालक व अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्याबाबत संदर्भीय पत्रांन्वये यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे. या अनुषंगाने आपल्या संस्थेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पूर्वी

या कार्यालयास सादर करावा. तसेच आपल्या महाविद्यालयामधील /परिसंस्थेमधील प्राचार्य/ संचालक/ शिक्षकांची पदे भरण्याची कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करण्यात यावी.

कळावे,

आपला

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव